जगायचंच राहून गेलं!

करायच्या राहून गेलेल्या गोष्टींची यादी मोठी आहे. त्या गोष्टी करता आल्या नाहीत, पण मनात-विचारात-चिंतनात त्या गोष्टी आहेतच राहून गेलेल्या! ... सांगत आहेत प्रसिध्द संगीतज्ज्ञ डॉ. अशोक रानडे

शैलेश जाधव



राहून गेलेली गोष्ट

आयुष्यात असं वळण येतंच कधी तरी, जेव्हा करायच्या राहून गेलेल्या गोष्टींची खूप आठवण येते. आपण ते का केलं नाही, असंही सारखं वाटत राहातं. अर्थात मुद्दाम काही ती गोष्ट सोडलेली नसतेच आपण. पण आयुष्यच असं घडत जातं की, कराव्याशा वाटणाऱ्या अनेक गोष्टी मागे पडत जातात. आपल्याही नकळत!

माझ्या तर अशा अनेक गोष्टी करायच्या राहून गेल्यात. आज संगीत क्षेत्रात नाव कमावलंय, तरीही संगीताशी संबंधित आणि इतरही अनेक गोष्टी मला करता आल्या नाहीत. मात्र करायच्या राहून गेलेल्या त्या गोष्टींचा विसर मला कधीच पडला नव्हता. अधेमधे त्या माझ्यासोबत असायच्या नि अजून असतातही. पण त्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करता आलं नाही, त्याचं अतीव दुःख मला आता होतंय.

अगदी लहानपणापासून मला संस्कृत आणि बंगाली या दोन भाषा शिकायच्या होत्या. या भाषांचं मला प्रचंड आकर्षण होतं आणि अजून आहे. कारण या भाषांना स्वतःची अशी एक परंपरा आहे. साहित्यापासून संगीतापर्यंत जीवनाच्या विविध अंगांना स्पर्श करणाऱ्या विविध ग्रंथांची संपन्नता या भाषांत आहे. अतिशय अर्थपूर्ण अशी शब्दसंपदा आहे. त्यामुळेच त्या भाषांतील ज्ञानाचं थेट आकलन व्हावं म्हणून या भाषा मला शिकायच्या होत्या. पण त्यांचा विधिवत अभ्यास करता आला नाही. परिणामी या दोन्ही भाषा मला थोड्याफार अवगत असल्या, तरी एकेका गोष्टीच्या खोलात जाण्यासाठी खूप अवधी लागतो.

संस्कृत भाषेतील शब्दांच्या नेमकेपणाचं तर मला नेहमीच कुतूहल वाटत आलंय. एखाद्या ठिकाणी विशिष्ट शब्द वापरलेला असेल, तर तिथे तोच वापरावा लागतो. दुसरा वापरून चालतच नाही. एवढी नेमकी भाषा दुसरी नाही. परंतु आपल्याकडे संस्कृतला उच्चवर्गाची भाषा ठरवून तिच्यावर अन्याय झालाय. परिणामी एकाचवेळी अनेकार्थ व्यक्त करण्याची क्षमता असलेल्या या भाषेकडे आता दुर्लक्ष होतंय. बंगालीही संस्कृतसारखी अशीच ज्ञानसंपृक्त भाषा आहे. पण त्यांचा नीट अभ्यास करणं माझ्याकडून राहूनच गेलं.

संस्कृत, बंगाली या भारतीय भाषांप्रमाणेच मला रशियन भाषाही शिकायची होती. कारण रशियन भाषाही सांस्कृतिकदृष्ट्या अतिशय संपन्न भाषा आहे. त्यामुळेच संगीत, नाटक आणि साहित्याच्या क्षेत्रात संपूर्ण जगाला मान्य झालेले कलावंत याच भाषेत जन्माला आले. आज रशियन साहित्य वाचायचं असेल, किंवा तिथल्या कर्तृत्ववान व्यक्तींचा आणि त्यांच्या कलाकृतींचा परिचय करून घ्यायचा असेल, तर इंग्रजीचा आधार घ्यावा लागतो. पण तेच थेट रशियन भाषेतून आकळून घेता आलं असतं, तर मला खचितच आवडलं असतं. पण जसं संस्कृत-बंगाली भाषा शिकून घेणं माझ्याकडून राहून गेलं, तसंच रशियन भाषा शिकणंही कालौघात सुटून गेलं.

मला भाषा, साहित्य, संगीत यांची मूळातच आवड आहे. त्यामुळे या विषयांच्या अनुषंगाने सातत्याने वाचत असतो, लिहीत असतो. पण त्या क्षेत्रातही काही भरीव करणं माझ्याकडून राहून गेलं. उदाहरणार्थ मला आशियाई देशांतील संगीताविषयी संशोधन करायचं होतं. आशियां खंडात येणाऱ्या देशांतील संगीतात काय फरक नि साम्य आहे, याची मला खूप उत्सुकता होती नि आहे. पण हातातील कामांमुळे मला त्या विषयाकडे लक्ष देता आलं नाही. एवढंच नाही, मला आफ्रिकाखंडाविषयीही बरीच ओढ आहे. मला ठामपणे वाटतं की आपल्याला त्या खंडाविषयी आणि त्यातील संस्कृतींविषयी अद्याप फार काही माहीत नाही. कुठलाही सण-उत्सव असो वा सुख-दुःखाचा प्रसंग असो तिथले आदिवासी एकत्र जमून नाचायला-गायला लागतात. मला त्यांच्या या कृतीमागच्या प्रेरणा शोधायच्या होत्या. पण तेही राहून गेलं.



संस्कृती-परंपरेचा किंवा आदिम प्रेरणांचा शोध घ्यायचा, तर त्यासाठी लोकविद्येचा(फोक लोर)शास्त्रशुध्द अभ्यास करणं गरजेचं असतं. लोकविद्येच्या अनुषंगाने आपण बोलत असतो. पण त्याला नेहमी ज्ञानाधार असतोच असं नाही. उलट अनेकदा हे बोलणं सामान्यजनांच्या अज्ञानावरच आधारलेलं असतं. म्हणजे त्यांना लोकविद्येबद्दल काही माहीत नसतं, म्हणून आपण काही गृहितकांची मांडणी करत जातो. अन्यथा लोकविद्येच्या अभ्यासाच्या पातळीवर आपली मांडणी खोटी ठरू शकते.

लोकविद्येच्या असलेल्या या ओढीमुळेच असेल कदाचित, पण मला शहर सोडून अनागर वस्तीत राहायला आवडलं असतं. शहरांतून आपल्याला मानवी विकासाची प्रक्रिया आकळून येत नाही. पण जर तुम्ही अनागर वस्तीत राहात असाल, तर भौतिक बदलाबरोबरच सांस्कृतिक अवकाशही कसा बदलत जातो, ते आपसूक उमगत जातं. मूळात अनागर संस्कृती ही अधिकाधिक निसर्गाला धरून राहाण्याचा प्रयत्न करते. निसर्गाशी समरूप असणं आणि राहाणं हेच खरं लोकजीवन आहे. ते सारं मला अनुभवता आलं नाही. परंतु ते अनुभवण्याची तीव्र ओढ होती खरी! त्यातून माझ्या साहित्य-संगीत विषयक संकल्पना कदाचित बदलल्या असत्या. मी अधिकाधिक निसर्गाशी प्रामाणिक राहिलो असतो... असं बरंच काही.

पण हे सारंच माझ्याकडून करायचं राहून गेलं. मी हातात असलेल्या कामांतच असा गुंतत गेलो की, एकेक गोष्ट निसटत गेली. करायच्या राहून गेलेल्या सगळ्या गोष्टी करणं वेळेच्या दृष्टीने विचार करता शक्य झाल्या असत्याच असं नाही. पण किमान काही करता आल्या असत्या, तर नक्कीच आवडलं असतं. भारतीय साहित्य-संगीताचा जसा मी अभ्यास केला आणि अजून करतो आहे, तसाच मला आपल्या एखाद्या शेजारी राष्ट्रातील साहित्य-संस्कृतीचा अभ्यास तीव्रपणे करायचा होता. बाजूबाजूलाच असलेल्या आणि भौगोलिकदृष्ट्या साम्य असलेल्या दोन देशांतील साहित्य-संगीतात काही फरक असतो का आणि असेल तर त्यामागची कारणं कोणती यांचा अगदी तपशीलात जाऊन वेध घ्यायचा होता. आपल्याला आजूबाजूच्या देशांतील किंवा एकूणच जगाच्या वेगवेगळ्या भागातील विविध गोष्टींची अनेकदा माहिती



असते. पण निव्वळ माहिती असणं वेगळं आणि त्याची परिपूर्ण माहिती असणं वेगळं. मला नेहमीच परिपूर्णतेचा ध्यास असतो. म्हणूनच आजवर अनेक गोष्टी करायच्या असतानाही केवळ पुरेसा वेळ देऊ शकणार नाही, म्हणून मी त्या थोड्या नजरअंदाज केल्या.

त्यामुळेच करायच्या राहून गेलेल्या गोष्टींची यादी वाढली खरी! पण उगाच काही तरी वरवरचं करण्या-बोलण्यापेक्षा मग त्या विषयाकडे पाठ फिरवलेली बरी. पण पाठ फिरवली म्हणजे तो विषयच सोडून दिला असं नाही. माझ्या मनात-विचारात-चिंतनात त्या गोष्टी आहेतच राहून गेलेल्या! अन् तरीही माझ्या आवडीच्या एवढ्या गोष्टी करायच्या राहून गेल्यात की, त्यामुळे जगायचंच राहून गेल्यासारखं वाटतंय.